# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. ३४१** **दिनांक ०६/१२/२०२१**

## चार चाकी वाहन चोरी करणाऱ्या सराईत आरोपीतांना अटक - पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण कक्षाची कामगिरी.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०९/११/२०२१ रोजी २१.०० वाजता ते दिनांक १०/११/२०२१ रोजीचे सकाळी ०७.०० वाजताचे सुमारास मौजे. पेल्हार येथील काठीयावाड हॉटेलचे समोर फिर्यादी यांची महिंद्रा कंपनीची बोलेरो पिकअप क्र. एम.एच.४८/टी.५६८८ ही उभी करुन ठेवलेली असतांना कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरी करुन नेलेबाबत फिर्यादी शगफ निसार लोणबाल, वय-३२ वर्षे, रा. मु. पो. पेल्हार, जामा मस्जिद जवळ, हॉटेल काठीयावाडीचे मागे, ता. वसई, जि. पालघर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपीतावर पेल्हार पो. स्टे. गु.रजि.नं. I ३६/२०२१ भा.दं.वि.सं. कलम- ३७९, ३४ प्रमाणे दि. १२/११/२०२१ रोजी १८:११ वा. गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदरील गुन्हयाचे अनुषंगाने पेल्हार पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ गुन्हयाची तांत्रिक माहिती व गुप्त बातमीदार यांचेमार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपी नामे. १) सरवर फतेह मोहम्मद खान यास दि. १६/११/२०२१ रोजी अटक करुन त्याचेकडून मिळालेल्या माहितीचे आधारे आरोपीत नामे. २) वासिफ साबिर अली यास प्रतापगड, उत्तरप्रदेश येथुन ताब्यात घेवुन अटक केली आहे. नमुद अटक आरोपीत यांचेकडून गुन्हयातील चोरीस गेलेली महेंद्रा बोलेरो कंपनीची पिकअप क्रं .एम. एच. ४८. टी. ५६८८ व आरोपीत गुन्हा करतेवेळी वापरत असलेली मारुती सुझूकी कंपनीची स्विप्ट कार क्र. एम. एच.०४. डी. जे. ९६१९ असा एकुण- २,९६,५००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. तसेच नमुद आरोपीत यांनी वालीव पोलीस ठाणे येथील गु.र.नं. I १२९१/२०२१, भादंविसं कलम- ३७९ प्रमाणे दाखल गुन्हा केल्याची कबुली दिल्याने सदरचा गुन्हा उघडकीस आला आहे. नमुद अटक आरोपीत यांचेवर मुंबई शहर, उत्तरप्रदेश, छत्तीसगड येथे चोरीचे गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे), पो.उप.नि/ सनिल पाटील, पोहवा टी. जी. माने, पो.ना. टी. एस. चव्हाण, प्रताप पाचुंदे, नामदेव ढोणे, पो. अं. संदिप शेळके, सचिन बळीद, रोशन पुरकर, बी. एस .गायकवाड, किरण आव्हाड, मोहसिन दिवाण, यांनी केली आहे.

---ooo---